# भीतीचा ब्रह्मराक्षस

मंजिरी निमकर

कोणी म्हणतं, आजची मुलंमुली किती हुशार आहेत, तरतरीत आहेत. पण या हुशार असण्यासाठी फार मोठी किंमत त्यांचे बालपण कुंठित करण्याच्या रूपात त्यांना मोजावी लागली आहे असं मला तरी वाटतं. काही जण म्हणतात हा सारा मीडियाचा प्रभाव आहे. मला मात्र वाटतं की हा 'मोठ्यां'चा प्रभाव आहे. आजची मुलं बेशिस्त वागतात कारण मोठ्यांना शिस्त नाही. मुलं स्व-केंद्री आहेत कारण मोठे संकुचित वृत्तीचे आहेत. मुले बेजबाबदार आहेत कारण शिकण्याव्यतिरिक्त बहुतेक वेळ मुले घरातच असतात. का - तर पालक त्यांना बाहेर जाऊ देत नाहीत. याचे कारण आजच्या मुलांना खेळायला मोकळ्या जागा नाहीत, मैदाने नाहीत, त्यामुळे मुले रस्त्यावर खेळतात आणि हे धोकादायक आहे. मुले घराबाहेर कोणत्या मुलांच्यात मिसळतात यावर नियंत्रण ठेवता येत नाही आणि मग पालकांना भीती वाटत राहते की मुलांना वाईट संगत लागेल. त्यापेक्षा त्यांनी घरातच थांबावे. अभ्यास करावा आणि फारच कंटाळा आला तर टी.व्ही. बघावा किंवा व्हिडीओ गेम्स खेळाव्यात.

घरच्या आणि बाहेरच्या कामांनी कंटाळलेले पालक टी.व्ही.वर मालिका पाहत बसतात. मुलांचीही मग तीच करमणूक असते. आपल्याबरोबर एक लहान मूल टी.व्ही.समोर बसलं आहे तेव्हा आपण कोणत्या मालिका पाहतो आहोत किंवा त्याबद्दल काय बोलतो आहोत याबद्दल पालक काही विचार न करता 'आप बीती' सारख्या भुताखेताच्या मालिका पाहत राहतात.

आजकाल अगदी तालुक्याच्या ठिकाणीही अपार्टमेंट्स्चे पेव फुटले आहे. घरासमोर अंगण नाही. बाग नाही. घरापुढे ओसरी, पडवी नाही. घरात कुत्रं, मांजर नाही. दारात गाय-बकरी नाही. घराचं दार लागलं की एक-दोन किंवा तीन बी.एच्.के. एवढं ५००-७०० चौ. फुटाचं मुलांचं जग. निसर्गाचा स्पर्श नाही. मग सहवास तर दूरच! मुलांचा सहभाग असू शकेल अशी कामेही फारशी नसतात. शेंगा सोलायच्या नसतात की पापडाला राखण बसायचे नसते. बरं, खेळायचं म्हटलं तर चेंडू - बिंडू घरात नाही खेळायचा. फ्लॅट संस्कृतीत वाचन संस्कृतीही अजून म्हणावी तशी रुजली नाहीये. मग करायचं काय मुलांनी? करमणुकीचे साधन म्हणजे टी.व्ही., व्हिडीओ गेम्स किंवा गप्पा. बहुसंख्य लहान मुले मोठ्यांच्या गप्पा ऐकत बसतात. आपल्याबरोबर एक मूल आपल्या गप्पा ऐकते आहे याचे भान तरी ही मोठी माणसे बाळगतात का? या प्रश्नाला 'नाही' असेच उत्तर द्यावे लागेल. 'मूल अजून लहान आहे. त्याला काय कळतंय?' या विचाराने किंवा 'मूल अभ्यास करत आहे. त्याचं आपल्या बोलण्याकडे लक्षच नाहीये.' असे समजून पालक बेफिकीर राहतात व वाटेल त्या गोष्टी मुलांसमोर बोलल्या जातात. मुलांना त्या नीटशा समजत नाहीत. पण ती स्पष्टीकरणे विचारत नाहीत किंवा विचारले तरी पालक काहीतरी थातुरमातुर सांगून त्यांची बोळवण करतात. मुले मग आपल्या मनाने त्याचा अर्थ लावतात. बरेचदा ती ऐकलेल्या एखाद्या गोष्टीने घाबरलेली असतात. ही भीती

त्यांच्या मनात आहे याचीच कित्येक पालकांना जाणीव नसते. कारण मुलांनी आपले बोलणे ऐकलेले नाही किंवा त्यांना ते समजलेले नाही किंवा आपण दिलेले तुटपुंजे स्पष्टीकरण पुरेसे आहे या सोयीस्कर गैरसमजात पालक असतात.

इयत्ता तिसरीतल्या मुलामुलींची लिखाणे तपासत होते. आमची शाळा तालुक्याच्या ठिकाणची. सोफीयाची वही वाचताना माझ्याच अंगावर काटा आला. ''मंगळवार पेठमध्ये कान्या राहतो. तर त्यांचे खूप दिवस भांडण चाललेले. तर वडाऱ्याच्या माणसाने एक दिवशी कान्याला मारलं. तर तो झोपलेला होता. वडारीचा माणूस आला आणि कान्याचा एक हात अर्धीपासून तुटलेला होता त्या हाताला नकली हात लावला होता, तो हात काढला आणि त्याला झोपेतून उठवलं. कान्या पळायला लागला चाकू आणायले तर त्याचा गटारात पाय अडकला. एका मुलाने त्याच्या गळ्यावर चाकू मारली. मग घरात नेलं कान्याला. मग डोळ्यांवर चाकू मारली. मग बकरी कशी ओरडते तसा कान्या ओरडला. मग मरून गेला.''

कान्या हा गावातला तडीपार असणारा कुप्रसिद्ध गुन्हेगार. जातीने मातंग असणाऱ्या कान्याच्या टोळीचे वडार टोळीशी वैर होते. त्या संघर्षातून घडलेल्या या खुनाचे जिवंत वर्णन करणाऱ्या या आठ वर्षांच्या मुलीच्या लेखन कौशल्याचे कौतुक करायचे की तिने एवढ्या भीषण घटनेचे 'आँखो देखा हाल' पाहिल्याप्रमाणे तंतोतंत वर्णन केलेले वाचून हादरून जायचे तेच कळेना. घटनेचे स्थळ लक्षात घेता त्या मुलीने ती पाहिली असण्याची सुतराम शक्यता नाही. मग इतके तपशीलवार वर्णन तिने कसे लिहिले असेल? आजूबाजूचे मोठे या घटनेचे



रसभरित वर्णन करीत असताना तिने ऐकले असावे हा एकमेव पर्याय आपल्यापुढे आहे. आणि तो पर्याय स्वीकारला तर त्याचा गर्भितार्थ घटनेइतकाच भीषण आहे. कारण त्यातून पालकांची मुलांच्या भावविश्वाविषयीची संवेदनहीनताच दिसते.

सोफीयानंतर पुढे वाचत गेले, तर शुभांगीने लिहिलं होतं, ''एक चौथीतली मुलगी शाळेतून घरी चालली होती. तर एक माणूस दारू पेऊन बसला होता. तर त्याने



त्या मुलीला बोलावले. फसवून उसात घेऊन गेला आणि तिथे त्या मुलीला कायतरी चावले. ती थोडा वेळाने बेशुद्ध पडली आणि तिथे एक विहीर होती. त्या माणसाने त्या मुलीला त्या विहिरीत टाकून दिली आणि ते ऐकून मला खूप भीती वाटली आणि दोन-तीन दिवस झाले मी आईची पाठच सोडत नाही आणि त्यामुळे आई बाहेर गेली की मी बाहेर जाते. आई घरात गेली की मी घरात जाते. मला असलं ऐकलं की खूप भीती वाटते.''

शुभांगीने लिहिलेली घटना ही एका अल्पवयीन मुलीवरील बलात्कार व खुनाची अघोरी घटना आहे हे कोणत्याही जाणत्या माणसाच्या ताबडतोब लक्षात येईल. ती घटना ऐकल्यामुळे पालकांच्या मनात भय, किळस, चिंता, अस्वस्थता निर्माण झाली असणार. बोलणाऱ्या आणि ऐकणाऱ्याच्या बोलण्यातून, देहबोलीतून या नकारात्मक भावना स्पष्ट झाल्या असणार, आणि ऐकणाऱ्या मुलीपर्यंत पोहचविल्या गेल्या असणार. जवळ असणाऱ्या आपल्या तिसरीतल्या मुलीसमोर एकतर हे बोलायला नको हे भान कोणीच पाळले नाही. बरे, चूक झाल्यावर ती निस्तरण्याची जबाबदारीही कोणी घेतली नाही. घडलेल्या घटनेने आपल्यालाही धक्का बसला आहे, भीती वाटते आहे, चिंता वाटते आहे हे कुणीच मुलीला स्पष्ट केले नाही. उलट तिने प्रश्न विचारल्यावर तिला उडवाउडवीची, सारवासारवीची उत्तरं दिली असणार. तिला दिलासा देऊन, 'मी तुला रोज शाळेत सोडायला येईन आणि घ्यायलाही येईन' असेही कुणी म्हटल्याचे दिसत नाही. त्यामुळे मुलीच्या मनातील भीती आणि चिंता अधिकच खोल जाऊन बसली.

सात वर्षांचा अनिकेत लिहितो,

''आमच्या तिकडच्या एका माणसाच्या अंगावरून ज्वारीचा ट्रक गेला. तो माणूस जाग्यावर खलास झाला. त्याच्या तोंडावरनं ट्रक गेला. तो मेला. त्याचे डोके तुटून पडलेले हात पाय तुटुन पडलेले, हे मला मामाने सांगितले.''

मुलाच्या मामाला साष्टांग दंडवत घालण्याव्यतिरिक्त या परिस्थितीत आपण दुसरे काय करणार?

लहान घरे आणि मुलांचे व मोठ्यांचे सतत एकत्र असणे, मुलांनी मोठ्यांचेच करमणुकीचे कार्यक्रम पाहणे, मोठ्यांच्या गप्पा ऐकणे यामुळे कधी नव्हे इतका बालक - पालक संवाद गरजेचा आणि महत्त्वाचा ठरला आहे. संवाद असेल तर मुलाच्या मनातील भीतीची, असुरक्षिततेची, चिंतेची पालकांना निदान कल्पना तरी येईल. आणि पालक आपल्या वागण्यात थोडातरी बदल घडवून आणू शकतील. आपल्या मुलाला 'मी इथे आहे.' 'तुझ्यासाठीच आहे.' 'तुला समजावून घेईन.' हा विश्वास देऊ शकतील. हा विश्वासच मुलांच्या मनातील कुरतडणारी भीती व चिंता कमी करू शकतो. तो विश्वासच मूल जेव्हा बाहेरच्या जगात जाऊ लागते, विविध भयप्रद गोष्टी अनुभवत असते तेव्हा त्यांच्या मनात आधाराला उभा राहतो. पालकांशी मुलामुलींचे नाते सुसंवादाचे असेल तर परिणामकारकरित्या या भीतीचा निचरा पालक नक्कीच करू शकतात.

चाळीस-पंचेचाळीस वर्षांपूर्वी मी जेव्हा या मुलांच्या वयाची होते तेव्हा काय करत असे, मला आठवतं, आमचे सहा-सात मुलामुलींचं मिळून एक टोळकं असे. शाळेव्यतिरिक्तचा सर्व वेळ खेळ, नाटकं, भटकंती, गप्पा यांच्यात आणि बहुतेक वेळा घराबाहेर जाई. मोठ्यांचा संबंध फक्त आमचा दंगा फारच वाढला तर गप्प करण्यापुरता किंवा भोंडल्याची खिरापत करून देण्यापुरताच असे. संध्याकाळी, रात्री, मोठ्यांची मित्रमंडळी आली तर लहानांनी गुपचूप आतल्या खोलीत जाऊन बसायचे ही आणि एवढीच शिस्त. टी.व्ही. नावाची भानगड त्यावेळी नव्हतीच. सिनेमांचे देखील लहानांनी पाहायचे आणि मोठ्यांनी पाहायचे असे वेगळेवेगळे दोन प्रकारच मानलेले असावेत. शाळेत असताना मी फक्त दोन सिनेमे पाहिले होते. 'राजा शिवछत्रपती' आणि 'निरुपमा आणि परीराणी'. पुढे माझी एस्.एस्.सी.ची परीक्षा संपल्यावर आईबरोबर पाहिलेला पहिला मोठ्यांचा सिनेमा म्हणजे राजेश खन्ना आणि शर्मिला टागोरचा 'आराधना'.

म्हणजे आजच्या काळाच्या दृष्टीनं पाहायचं तर एकाअर्थी आम्ही अगदीच बावळट होतो, आम्हाला जगात काय घडतं याची काहीही जाणीव नव्हती. तर दुसरीकडून वाटतं की केवढे तरी लांबलचक बालपण आम्हाला उपभोगायला मिळालं होतं. त्या तुलनेने आजच्या मुलांकडे पाहताना वाटतं ती फारच वेगाने मोठी होताहेत. त्यांच्या बालपणाचीच किंमत त्यांना द्यावी लागते आहे, मोठे त्यांना ती द्यायला लावत आहेत.

●

manjunimbkar@rediffmail.com